# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक १६/०४/२०२२ (शनिवार)

---

## ट्रॅक्टरची ट्रॉली चोरी

**पोलीस स्टेशन मौदा** – अंतर्गत तारसा शिवार १२ किमी उत्तर, यातील फिर्यादी यांनी मागील वर्षी ट्रॅक्टरसाठी जे.एस.ॲग्रो.इंडस्ट्रिज चाचेर येथून ट्रॉली विकत घेतली होती. त्या ट्रॉलीमध्ये तनस भरून दिनांक १४/०४/२०२२ रोजी रात्री ०६.०० वा दरम्यान शेतात उभी केली होती, **व दि १५.०४.२२ रोजी ०७.०० वा दरम्यान तनस खाली करण्याकरीता गेले असता, सदरची ट्रॉली कि ६०,०००/– रु ची शेतात दिसली नाही. कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरून नेली.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे – किष्णा रामदासजी वंजारी वय ३८ वर्ष रा.तारसा ता. मौदा यांचे रिपोर्टवरून पो स्टे मौदा येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३७९ भा.द.वि. अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला, सदर गुन्हयाचा पुढील तपास पो. हवा संजय देशमूख मो क्र ९९२२४४७०४५ करीत आहेत.

## इलेक्ट्रॉनीक मोटार मशीन चोरी

**पोलीस स्टेशन खापरखेडा** – अंतर्गत मौजा नांदा शिवार ०७ किमी प, यातील फिर्यादी यांचे काका राजकूमार मोटघरे रा. धंतोली नागपूर यांचे ४ एकर शेतात गोट फॉम व पोल्ट्री फॉम शेड असुन दाना बारीक करण्याचे दोन फिड क्रशर मशीन असुन त्याला लावलेले **इलेक्ट्रॉनीक मोटार मशीन प्रत्येकी २ एच.पी. किंमती एकुण ३०,०००/– रू. चा माल दिनांक ११/०४/२०२२ चे ०६.०० ते दिनांक १५/०४/२०२२ चे १५.०० वा दरम्यान कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे – मोंन्टी निलेश मुटकूरे वय २८ वर्ष रा प्लाट नं ५३२ दसरी रोडभूतीया दरवाजा महाल, नागपूर यांचे रिपोर्टवरून पो. स्टे. खापरखेडा येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ४६१,३८० भा.द.वि. अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला, सदर गुन्हयाचा पुढील तपास पो.हवा नावेद खान मो ८२०८५११६६३ करीत आहेत.

## पळवुन नेणा–या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन कळमेश्वर :–** अंतर्गत मौजा बोरगाव खुर्द १६ कि मी उत्तर, दिनांक ०२/०४/२०२२ चे ०९.०० वा. यातील फिर्यादी यांची अल्पवयीन भाची वय १६ वर्षे ०३ महिने हिला **आरोपी नामे – ताजेंन्द्र हंसराज नन्थने रा. फेटरी गोडावून यांने फिर्यादीचे कायदेशिर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.**

सदर प्रकरणी फिर्यादीचे तोंडी रिपोर्टवरून पोस्टे कळमेश्वर येथे आरोपीविरूद कलम ३६३ भा.द.वि. अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला, सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनी /खंडसे मो न ९४२१०५०३७० करीत आहेत.

## डिवायडर वर गाडी चढवुन नुकसान

**पोलीस स्टेशन काटोल** – अंतर्गत मौजा खानगाव ता. काटोल शिवार ०८ किमी पश्चिम, दिनांक १४.०४.२२ चे २१/३० ते २२/०० वा दरम्यान, यातील आयसर ट्रक क्र. एम.एच. ४० सी.डी. १७९० चा चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन काटोल ते वरूड या राज्य महामार्ग क्र. एन एच ३५३ वरील **डिवायडर ला धडक मारल्याने डिवायडर वरील ६ रैलिग, एक बिलिंकर लाईट एक साइनबोर्ड टुटफुट होवुन एकुण अंदाजे १,००,०००/– रू. नुकसान झाले.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे – अतेन्द्र राजपालसिंग पाल वय ४४ वर्ष रा. ह. मु. भारसिंगी ता. काटोल यांचे रिपोर्टवरून पो. स्टे. काटोल येथे आयसर ट्रक क्र. एम.एच.४० सी.डी. १७९० चा चालकाविरूध्द कलम २७९,४२७ भा.द.वि. अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला, सदर गुन्हयाचा पुढील तपास पो. हवा प्रभुदास दलाल मो.क्र ९५६१५६४८५२ करीत आहेत.

## अपघातात मृत्यु

**पोलीस स्टेशन केळवद :–** अंतर्गत मौजा उमरी आर.टी.ओ. टोलसमोर दिनांक १५.०४.२२ चे १२.०४ वा यातील मृतक नामे– गजानन दिगांबर कोरडे ३९ वर्ष रा. भजी मार्केट पांढुर्णा (म.प्र.) हे आपले भाचा व मित्र शैलेश मदनकर सोबत नागपूर वरून आपले घरी मौलाना आझाद वार्ड भाजी मार्केट पांढुर्णा येथे आपली मो. सा. क्र. एम.एच. ३१/ बी.एच. ८२६९ ने जात असता मौजा उमरी गावाचे पुढे आर.टी.ओ.टोल नाक्याचे जवळ मोटर सायकल ही दगडावरून **उसळुन खाली पडल्याने डोक्याला जबर मार लागून गंभीर रित्या जखमी झाले, ग्रामीण रूग्णालय सावनेर येथे प्रथमोपचार करून मेडीकल कॉलेज नागपूर येथे रेफर करण्यात आले, उपचारादरम्यान दिनांक १२.०४.२०२२ रोजी सकाळी ०७.१० वा दरम्यान डॉक्टरांनी मृत घोषीत केले.**

सदर प्रकरणी पोलीस स्टेशन केळवद येथे मर्ग चे कागदपत्र प्राप्त झाल्याने कलम १७४ जाफौ अन्वयें मर्ग नोंद करण्यात करण्यात आला, सदर मर्गचा पुढील तपास पो हवा/पवार ७८७५९८३३६० करीत आहेत.

## रेल्वेने कटुन मृत्यु

**पोलीस स्टेशन काटोल :–** अंतर्गत चरडे मंगल कार्यालय जवळ चे रेल्वे गेट जवळ २ की मी उत्तर, यातील मृतक नामे– सरस्वताबाई शेषराव मानकर वय ६२ वर्ष रा फैलपुरा काटोल हीने **डोक्याचे व मनक्याचा त्रासाला कटांळुन रेल्वेने कटून मरण पावली.**

सदर प्रकरणी फियादी नामे– मनोज शेषराव मानकर वय ४४ वर्ष रा फैलपुरा काटोल मो न ७०२८१४९४४६ याचे रिपोर्टवरून पो स्टे काटोल येथे कलम १७४ जाफौ चा मर्ग दाखल करण्यात आला, सदर मर्गचा पुढील तपास पो हवा अरून भेन्डे पोस्टे काटोल मो ९९२३१९३६४२ करीत आहेत.

**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपुर**